# भद्रकाली

(महाराणी ताराबाईंच्या जीवनावरील उत्कंठावर्धक, ऐतिहासिक कादंबरी)

अनंत तिबिले

रिया पब्लिकेशन्स्

**भद्रकाली : अनंत तिबिले**

**© शितल मेहता**
कोल्हापूर.

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
२५०, ब-३०, शीतल बंगला,
नागाळा पार्क, कोल्हापूर.
मोबा. : ९४२२४२१५०२

**अक्षरजुळणी**
रविंद्र सावंत
९६८९९०९८९८

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
श्री ज्योतिर्लिंग ऑफसेट, कोल्हापूर.

**द्वितीय आवृत्ती**
मार्च, २०१२

**किंमत**
रुपये ४००/-

महाराणी ताराबाईंवर हयातभर निष्ठा ठेवून वावरणारे, महाराणी ताराबाईंच्या कर्तृत्वाचे पोवाडे गाणारे पूज्य काकाजी तथा व्ही. टी. पाटील संस्थापक, संचालक ताराराणी विद्यापीठ, कोल्हापूर यांना सादर समर्पण...

# मुजरा

माझ्या या कादंबरीची प्रेरणा परमपूज्य काकाजी तथा व्ही. टी. पाटील होत. महाराणी ताराबाईंवरील परमपूज्य काकाजींची श्रद्धा सर्वश्रुतच आहे. त्याचं प्रतीक म्हणजे कोल्हापुरातील ताराराणी विद्यापीठाची भव्य वास्तू आणि या वास्तुच्या प्रांगणात उभा असलेला महाराणी ताराबाईंचा भव्य-दिव्य अश्वारूढ पुतळा. पूज्य काकाजींनी हयातभर महाराणी ताराबाईवर श्रद्धा ठेवली. महाराणी ताराबाईंच्या ज्वलंत, कर्तबगार नि तेजस्वी चरित्राने हयातभर दिङ्मूढ होऊनच ते वावरले. करवीर संस्थापिका म्हणून नव्हे तर हिंदू धर्म शिक्षिका म्हणून साऱ्या भारतवर्षानं मुक्तकंठानं महाराणी ताराबाईंचे गुणगान गावे असंच प्रत्येकाला सांगत राहिले. ताराबाई म्हणजे भारतवर्षाचं भूषण. असं भूषणावह चरित्र अक्षय टिकलं पाहिजे असं त्यांचं प्रामाणिकपणाचं मत, म्हणूनच तर त्यांनी आपला सारा पैसा, श्रम, वेळ ताराराणी विद्यापीठाच्या संस्थापनेत लावला. प्रा. जयसिंगराव पवारांच्यासारख्या इतिहास तज्ज्ञाकडून महाराणी ताराबाईंचं चरित्र लिहून घेऊन ते प्रसिद्ध केलं. एवढ्याने तृप्त न होता महाराणी ताराबाईंवर कादंबरी, नाटक, सिनेमा निघायला हवा असं आग्रहानं प्रतिपादन केलं, त्यासाठी ख्यातनाम लेखकांना ताराराणी विद्यापीठात आग्रहानं बोलावून वाटेल तेवढा पैसा खर्च करण्याची तयारी दर्शवून त्यांना कादंबरी-नाटक लिहिण्याची आग्रहाची विनंतीही केली; पण कादंबरी-नाटक हे पूज्य काकाजींचं स्वप्न साकार करण्यासाठी कुणा लेखकानं तसा प्रयत्नच केला नाही. सगळ्यांनी ती. काकाजींना केवळ आश्वासनं दिली.

माझ्या 'शापित राजहंस' या छ. संभाजीराजांच्या जीवनावरील कादंबरीने ती. काकाजींचा नि माझा परिचय घडवून दिला. याच परिचयात ती. काकाजींनी माझ्यावर महाराणी ताराबाईंवरील कादंबरीची जबाबदारी सोपविली. या कादंबरी निर्मितीला लागणारं सर्वतोपरी साहाय्य करण्याचं मला अभिवचन दिलं. ती. काकाजींनी माझा वकूब न ओळखताच माझ्यावर ही जबाबदारी सोपविली होती. मी गांगरलो. महाराणी ताराबाईंवर कादंबरी लिहिणे येरागबाळ्याचे काम नव्हे हे

महाराणी ताराबाईंच्या संदर्भातली चार-दोन पुस्तके चाळताच माझ्या ध्यानी आले आणि मग एका अनामिक भयाने माझी छातीच दडपून गेली.

पण तरीही या लेखकाला आव्हान म्हणून मी ती. काकाजींची विनंती आज्ञा समजून मनावर घेतली. एक भारतीय या नात्यानं महाराणी ताराबाईंसारख्या तेजस्वी भारतीय नारीच्या कर्तृत्वाचा आलेख मांडणं- माझं परमपवित्र कर्तव्य आहे असं स्वत:लाच तीन, तीनदा बजावलं आणि मग पूज्य काकाजींच्या मार्गदर्शनाखाली अभ्यास नि लेखन यांना सुरुवात केली आणि अखेर पूज्य काकाजींचं स्वप्न साकार करण्याचं भाग्य मला लाभलं. तसं पाहता 'भद्रकाली' चं श्रेय पूज्य काकाजींना आहे. मी केवळ निमित्त आहे. तेव्हा महाराणी ताराबाईंच्या कर्तृत्वाचा आलेख वाचकांना आवडलाच तर त्यांनी पूज्य काकाजींना धन्यवाद द्यावेत कारण ती. काकाजींचं मार्गदर्शन, प्रेरणा लाभली नसती तर हे काम माझ्या हातून कदापी झाले नसते हे मी इथं प्रांजळपणाने नमूद करतो आहे.

या कामी मला अनेकांचं साहाय्य लाभलं. त्यात शिवाजी विद्यापीठाचा प्रामुख्याने उल्लेख करायचा आहे, कारण मला लागणारे सारे संदर्भग्रंथ शिवाजी विद्यापीठाने मला दिले. साहजिकच शिवाजी विद्यापीठाचे ग्रंथपाल, ग्रंथालयातील इतर कर्मचारी वर्ग यांच्या ऋणाचा उल्लेख केला नाही तर मी कृतघ्न ठरेन.

गुरुतुल्य रा. वा. शेवडे गुरुजी, प्राचार्य रेगे, प्रा. द. के. बर्वे, नलबीड मोहिते यांचे शुभाशीर्वाद हे तर माझ्या यशाचं गमक. त्यांनी वेळोवेळी उचित मार्गदर्शन व माझा उत्साह वाढविला नसता तर हे आव्हान पेलवलेच नसते.

'शापित राजहंस'च्या रूपानं वाचकांसमोर माझ्यासारख्या नवख्या माणसाला आणण्याचे साहस अजब पुस्तकालयाचे श्री. शितल मेहता यांनी केलं. त्यांच्या या धाडसानंच मला माझ्या यशाचा मार्ग दाखविला. तेव्हा त्यांचा ऋणनिर्देश करणं मी माझे कर्तव्य समजतो.

ऐतिहासिक लेखन केवळ संदर्भग्रंथाच्या मार्गदर्शनाने पुरे होत नाही. हिंदवी सुराज्य साकार करणाऱ्या छ. शिवाजी महाराजांच्यापासून दिल्लीपती आलमगिरासारख्या धर्मांध शहेनशहाची कबर दक्षिणेतच बांधावयास भाग पाडणाऱ्या महाराणी ताराबाईंपर्यंतच्या थोर व्यक्तींच्या पुनित स्पर्शाने पावन झालेल्या गडकोटांना भेटी देणं, दऱ्याखोरी पालथी घालणं, त्या त्या ठिकाणची मिळेल तेवढी माहिती, दंतकथा गोळा करणं महत्त्वाचं असतं. या लेखनाच्या निमित्तानं मलाही भ्रमंती करावी लागली; पण ही भटकंती मी एकटा कदापि करू शकलो नसतो. त्यासाठी मला काही छोट्या मित्रांचं साहाय्य लाभलं. यात संजय जाधव, किशोर जाधव, प्रकाश जाधव, मोहन प्रभुणे, प्रकाश सुतार, सुभाष जाधव या माझ्या छोट्या मित्रांच्या सोबतीचा आवर्जून उल्लेख करावाच लागेल. मला ही छोटी मंडळी साथीला नसती तर माझं हे काम मला पूर्ण करताच आलं नसतं.

मी एका माध्यमिक शाळेतला शिक्षक. म्हणजे नोकरीच्या जोखडात पूर्णत: अडकलेला माणूस आणि ऐतिहासिक लेखनाला तर माणूस मुक्त असावा लागतो. कोणत्याही प्रकारचं बंधन, मर्यादा त्याला असता नयेत असं माझं प्रामाणिक मत. मलाही कधी मी बंधनात आहे असं वाटलं नाही. भ्रमंती वा लेखनात मला कोणत्याही प्रकारानं माझ्या नोकरीनं अडथळा आणला नाही आणि याचं खरं कारण माझ्या शाळेचे संचालक-मुख्याध्यापक श्री. बा. वि. वडेर आणि माझे इतर सहाध्यायी या सर्वांच्या सहकार्याबद्दल ऋणनिर्देश करून मला त्यांचं सहकार्य संपुष्टात आणायचं नाही; कारण ही तर माझी सुरुवात आहे आणि शेवटाकडे जायचं तर यांचं सहकार्य लाभल्याविना हे होणे नाही. याप्रसंगी त्यांच्या सहकार्याची यापुढेही मजला गरज आहे हे मी विनम्रपणे इथं नोंद केले तर ते वावगे ठरू नये.

मी सदा सुदैवी, कारण नियतीनेच एका उत्तम टीकाकाराशी माझे जीवन बांधून टाकलेले आहे. हा टीकाकार दुसरा तिसरा कुणी नसून माझी पत्नी सौ. ऊर्मिला. तशी ती लेखनाकडे वळली असती तर एक ख्यातनाम साहित्यिक म्हणून तिने खचितच लौकिक संपादन केला असता; पण केवळ आकडेमोडीच्या नोकरीने तिच्यातील प्रतिभेला नीरस बनविले. त्यात संसाराची जबाबदारीही माझ्यापेक्षा अधिक तर तिच्याच शिरावर पडली. साहजिकच लेखन ती करूच शकली नाही; पण मी लिहिलेली ओळ नि ओळ तिच्यातील साहित्यिकाने नजरेखालून घातली. खूप चिकित्सा केली, कित्येक वेळा प्रकरण बदलून टाकावयास भाग पाडले. मीही न कुरकुरता ते बदलले. कारण माझी खात्री होती, सौ. ऊर्मिलेच्या नजरेने जे पसंत केले ते वाचकांनाही खचितच आवडेल. तेव्हा माझी ही निर्मिती वाचकांना आवडलीच तर याचं श्रेय माझ्याबरोबरच मला सुदैवानं प्राप्त झालेल्या एका समीक्षकाला - माझी पत्नी सौ. ऊर्मिलेलाही आहे हे मी इथं आवर्जून नमूद करतो आहे.

मी तर साहित्य दरबारातील एक सामान्य सेवक. नुकताच दरबारात प्रवेश घेतलेला. या दरबारातील यशस्वी सरदार-दरकदार होण्याचं भाग्य अजुनी मला लाभलेलं नाही. मात्र मी जी सेवा करतो आहे ती इतिहासाची बूज राखून इमाने इतबारे. 'शापित राजहंस'च्या द्वारे नाहक उपेक्षिल्या गेलेल्या छ. संभाजी राजांच्या कर्तृत्वाचा आलेख मी मांडला. रसिक वाचकांनी तो गोड मानून घेतला. पावणे तीनशे वर्षे उपेक्षिल्या गेलेल्या महाराणी ताराबाईंच्या तेजस्वी, कर्तबगार जीवनाला न्याय देण्याचं मी काम केलेलं आहे - तेही इतिहासाशी प्रामाणिक राहून. वाचकांनी हे गोड मानून घेतले तर पावणे तीनशे वर्षांनंतर का होईना एका उपेक्षित जीवनाला न्याय मिळवून दिल्याचं श्रेय मला मिळेल नि मी कृतार्थ होईन. रसिक मराठी वाचकांना मुजरा करताना केवळ हीच एकमेव इच्छा.

**- अनंत तिबिले**

# एक

हंबीरराव मोहित्यांनी घोड्याला टाच मारली. तसा त्यांचा कृष्णवर्णीय उमदा घोडा केवढ्यांदा तरी खिंकाळला - निमिषमात्रच मागच्या दोन्ही पायांवर उभा राहिला आणि मग दुसऱ्याच क्षणी उधळला. सरनोबत हंबीरराव मोहित्यांचा घोडा उधळला असं पाहताच त्यांच्याबरोबरच्या बाकीच्या निवडक मावळा शिपायांनीही उसंत घेतली नाही. त्यांनीही आपापल्या घोड्यांना टाचा दिल्या आणि मग साऱ्यांचीच घोडी एकाच वेळी धुळीचा लोट उडवीत चौखूर उधळली.

सकाळची वेळ. रस्ता अरुंद जंगलाचा - गर्द झाडीने वेढलेला. शिवाय मार्ग बिकट चढउताराचा; पण मर्दमावळ्यांप्रमाणेच त्यांच्या उमद्या घोड्यांनाही घनदाट जंगल, दऱ्याखोऱ्यांतील अरुंद वाटा, भयानक चढउतार यांचा जणू सरावच झालेला. त्यामुळेच की काय त्यांच्या गतीत अणुमात्र फरक पडत नव्हता की, एखाद्या चिंचोळ्या अवघड वळणाने त्यातील एखादे घोडे बिचकत नव्हते.

रस्ता अरुंद आणि अवघड असला तरी हिरव्यागार वनश्रीचं सुंदर रूप काहीसं आगळं-वेगळं आणि मोहविणारं होतं खचित ! वेडीवाकडी वळणं घेत पुढं गेलेला तो अरुंद रस्ता जणू घनदाट जंगलातून वाट काढीत सहजतेनं वळणं घेत पुढं धावणाऱ्या नागसर्पासारखा वा एखाद्या उंचावरून जन्म घेऊन वाट मिळेल तिथून वाट काढीत

पुढं-पुढंच धावणाऱ्या निर्झरासारखा भासत होता. घोड्यांच्या टापांच्या आवाजानेच की काय दुतर्फाच्या गर्द झाडांवर बसून राहिलेले नानाविध पक्षी घाबरून, भांबावून विचित्र आवाज करीत एकदमच उडत होते आणि थव्याथव्यांनी पसार होत होते. शिवाय मधूनच कानांवर येणाऱ्या एखाद्या हिंस्र श्वापदाचा आवाज आणि वनराजाची भयप्रद घनगंभीर गर्जनाही भर घालीत होती; पण नेहमीच डोंगर, दऱ्याखोऱ्यांना सांगाती मानणाऱ्या आणि हिंस्र श्वापदं आणि गडकोटांच्या कुशीत विसावणाऱ्या मर्दमावळ्यांना हे काही नवे नव्हते आणि म्हणूनच वनराजाच्या तितक्याच भयप्रद गर्जनेला भीकही न घालता त्यांची घोडी त्याच वेगाने पुढे पुढेच दौडत होती.

वाट अरुंद होती, बिकट होती. शिवाय वळणाची होती; पण या साऱ्यांपेक्षा त्या तुकडीतील प्रत्येकाला एक आगळी-वेगळीच भीती वाटत होती. गेली दोन-तीन वर्षे दौलतीत जे घडले होते, घडत होते आणि जे घडण्याची केव्हाही शक्यता होती, त्यामुळेच की काय, दौलतीत वावरणारा प्रत्येकजण खांद्यावर हे एक अनामिक भय घेऊनच वावरत होता. एखाद्या काळ्याकुट्ट मेघानं चंद्रबिंबाला ग्रासावं तद्वतच यवनसत्तेनं हिंदवी स्वराज्याला ग्रासलं होतं. गनीम मोठा होता. अफाट सैन्य, अमाप पैसा बरोबर घेऊनच तो औरंगजेबासारख्या कडव्या नेतृत्वाखाली एखाद्या अजस्र अजगरासारखा दौलत घशात घालण्याच्या इराद्याने दौलतीला विळखा घालून बसला होता.

थोरले महाराज...... काळाच्या पडद्याआड. त्यांचं उत्तुंग अस्तित्व लोपलं होतं. थोरले महाराज हयात होते तोवर त्यांचे नित्याचे शब्द मराठी दौलतीचा पाईक कधीच विसरू शकत नव्हता. प्रत्येक मर्द मराठा त्या शब्दांना प्राणमोलानं आपल्या कलेजात जतन करून होता.

थोरले महाराज म्हणत असत, ''राज्य सबल होते ते केवळ सैन्याच्या संख्येवर नव्हे! लोकांची संख्या बाजारबुणग्यांनीही मोठी करता येते; पण ती दौलतीची हिफाजत - रक्षण करू शकत नाही. दौलतीची हिफाजत ज्यांचं दौलतीवर प्रेम आहे आणि दौलतच ज्याचं सबकुछ आहे, तेच करू शकतात. इतरांना ते कदापि जमायचं नाही.''

थोरल्या महाराजांचे हे अमृतबोल दौलतीच्या प्रत्येक सैनिकाच्या दिलात अगदी कायमचे कोरले गेले होते आणि म्हणूनच तर मराठी दौलतीचा पाईक बेडरपणे मोठा गनीम पाठीवर घेऊन राजरोसपणे साऱ्या दौलतीभर संचार तर करीत होताच; त्याचबरोबर मोका साधून आणि मोठ्या गनिमाला अंगावर घेऊन त्याला बिनदिक्कतपणे कापूनही काढीत होता.



समशेर हातात घेऊन शिलेदारी व्रताची आण घेणाऱ्या शिलेदार मावळ्यांना युद्धाचं भय मुळीच वाटत नव्हतं. मृत्यूही त्यांना कधी भीती दाखवू शकत नव्हता. मरणाचं भय त्यांना वाटलं असतं तर कोंडाण्यावर आत्मबलिदान करून अमर झालेला तानाजी मालुसरे वा जोशात केवळ सातजणांसह दौडून गनिमावर धावून जाऊन प्रत्यक्ष मृत्यूला मिठी घालणाऱ्या सरनोबत प्रतापराव गुजरासारखे मर्द मराठे दौलतीत ख्याती पावलेच नसते. केवळ दौलत बुडविण्याच्या जिद्दीने दक्षिणेत ठाण मांडून बसलेल्या अफाट ताकदीच्या औरंगजेबाला इतकी सालं केवळ इंतजारीत काढावीच लागली नसती.

पण तसे झालेच नव्हते. थोरल्या महाराजांचे कुशल नेतृत्व, तानाजी मालुसरे, बाजीप्रभू देशपांडे, नेताजी पालकर, येसाजी कंक, मोरोपंत, अनाजी दत्तो आदींसारख्या नि:स्पृह आणि बेडर शिलेदारांची तेवढीच बेडर साथ, केवळ यामुळेच दौलत तर बुडाली नव्हतीच उलट या तुटपुंज्या दौलतीने हिंदुस्थान सम्राट औरंगजेबाला 'दे माय धरणी ठाय' करून सोडलं होतं. दररोज यवन मोठ्या संख्येने कापून काढला होता. 'हर हर महादेव'च्या गर्जनांनी काफर यवनांना चळाचळा कापायला भाग पाडले होते.

पण नियतीलाच हे पहावलं नव्हतं. दौलतीवर संकटाचं सावट पसरलं होतं. होत्याचं नव्हतं झालं होतं. प्रत्यक्ष जगदीश्वराने थोरल्या महाराजांनाच जवळ केलं होतं. केवळ एवढंच घडवून काळ तृप्त झाला नव्हता. तो आज दुष्मन बनून दौलतीसमोरच ठाकला होता. सुराज्य संस्थापक श्रीमान छत्रपती शिवाजी राजांचे महानिर्वाण झाले.

दौलतीकडे त्यांनी पाठ फिरविली, त्यांचं कुशल नेतृत्व संपलं आणि दौलतीत असणारे काही मातब्बर असामी त्यांचे अमृतवचन विसरले. मतलबाचं महापिशाच्च त्यांच्या गर्दनीवर आरूढ झाले. प्रतिष्ठेचाच हिसाब त्यांच्या दिलात घर करून बसला आणि याचा नतीजा म्हणून दौलतीतल्या स्वकीयांतच कट-कारस्थानांना ऊत आला. दौलत कुणाची, स्वामी कोण हाच सवाल आपला अक्राळविक्राळ जबडा पसरून साऱ्यांना वाकुल्या दाखवू लागला. स्वार्थाने अंध झालेल्या मराठी नेतृत्वाला थोरल्या महाराजांच्या शब्दाची विस्मृती घडली.

स्वार्थ खरंच इतका दुष्ट असतो का ? तो दुष्ट तर असतोच शिवाय क्रूर असतो. माणसाच्या ध्येयधोरणांना तर तो सुरुंग लावतोच, उलट त्याच्यातील माणुसकीचाही गळा घोटतो. त्याला पुरता सैतान बनवितो.

स्वत:लाच सवाल पुसणारे सरनोबत अंतर्मुख झाले, गंभीर बनले - आणि मग त्यांच्या गंभीर नजरेसमोर आणखीन एक प्रसंग जसाच्या तसा उभा राहिला - ते पुन्हा त्या प्रसंगात स्वत:ला हरवून बसले. घोड्यावर स्वार झालेले सरनोबत हंबीरराव मोहिते वायुवेगाने पुढे-पुढेच चालले होते; पण थोरल्या महाराजांचे आणखीन काही शब्द जसेच्या तसे त्यांना आठवत होते. थोरले महाराज म्हणत, ''दौलत उभी राहावी ही तो श्रींची इच्छा. हिंदवी सुराज्याची स्वामिनी खऱ्या अर्थाने आई भवानी. देव, धर्म नि देश या पायी सर्वस्व निछावर, सदैव सज्ज राहणं हा तुम्हा-आम्हा दौलतीच्या पाईकांचा फर्ज. समर्थांनी सुद्धा हीच नसीहत नाही का दिली? त्यांनी आपल्या अमृतवचनात साऱ्यांना हेच बजावलंय, 'मराठा तितुका मेळवावा, महाराष्ट्र धर्म वाढवावा.' ''

थोरले महाराज आपल्या धीरगंभीर वाणीत हे असंच काही बोलत राहात. त्या वख्ती दौलतीच्या रयतेच्या अंगावर मूठ मूठभर मांस चढे. देव, धर्म नि देश एवढंच साऱ्यांच्या नजरेसामने उभं राही. मनगट फोलादी कांब बने नि मग 'हर हर महादेव'च्या गर्जनेने मी मी म्हणणाऱ्यांचा थरकाप उडे, भले भले नेस्तनाबूत होत.

थोरले महाराज गेले नि होत्याचे नव्हते झाले. दौलतीचे रूपच बदलले. थोरले महाराज होते त्या वख्ती सारेच दौलतीचे पाईक होते; पण आता स्वामिनिष्ठ सेवकही आपल्या तोलामोलाच्या गोष्टी करू लागले. मानभंगानं डिवचून जाऊन नि दौलत, देव, धर्म विसरून मतलबी राजकारण खेळू लागले - दौलतीचे तुकडे पाडण्याइतपत एवढंच नव्हे तर दौलत गनिमाच्या हवाली करण्याइतपत त्यांची मजल गेली. पुढं धावणारे हंबीरराव मोहिते पुराऱ्या यादगारीत गुरफटले होते. गतस्मृतींत त्यांचा दिल अडकला होता.

स्वत:ला पुसू लागले होते, 'माणूस जातो. जन्माला येणाऱ्याला एक ना एक दिवस जावंच लागतं; पण त्यांचे बहुमोल शब्द, त्यांचा आदर्श, त्यांचं उत्तुंग व्यक्तिमत्त्व, शौर्य, गनिमाला खडे चारण्याचा त्यांचा झपाटा हे का स्मृतिआड होतं? मग कंसासुराचा वध करणारा श्रीकृष्ण वा रावणसंहारकर्ता प्रभू रामचंद्र अजुनी स्मृतिआड होत नाही त्याची वजह काय ?'

श्रींच्या इच्छेप्रमाणे दौलत साकार झाली होती. मराठ्यांचा भगवा झेंडा सह्याद्रीच्या कडेकपारीवर डौलात फडकू लागला होता. मराठी धर्म बुडवू पाहणारे आणि मराठ्यांना पाण्यात पाहणाऱ्या विजापूरच्या आदिलशाहीतील दोन उन्मत्त सरदार हिंदवी सुराज्य बुडविण्याच्या हेतूने पुढे सरसावले होते. मोठ्या सैन्यानिशी



रणमस्त खान आणि बहलोल खान आपल्या बळावरच्या फाजील अभिमानानं पुढे-पुढेच सरकू लागले होते. दोघेही कुशल सेनानी शिवाय त्यांचं बळही मोठं. दौलतीतील गावं जाळीत, देवळं पाडीत आणि मराठी धर्म बुडवित धामधूम करीत हे दोन्ही मदमस्त हत्ती धुमाकूळ घालीत होते.

अफाट सैन्य आणि तेवढीच तेज शस्त्रं घेऊन दौलतीत घुसलेल्या त्या दोन उन्मत्त सैतानांशी झगडा करणं का तेवढं साधं आणि आसान काम होतं ? त्या वख्ताला काय होतं दौलतीत ? नव्हता पैका की नव्हती शस्त्रास्त्रं- होते फक्त अडाणी-भोळ्या भाबड्या मावळ्यांचे मोजकेच हात. गंजलेले भाले आणि बोथट झालेल्या समशेरी. त्याच हाती घेऊन ते तेवढ्याच जिद्दीने पुढे सरसावले.

थोरले महाराजही नाउमेद झाले नव्हते. उलट आपल्या पदरी असलेल्या मोजक्याच पण समर्थ मावळ्यांच्या जिद्दीवर त्यांचा विश्वास होता. दौलतीवर नितांत प्रेम आणि अपार निष्ठा असलेली ही भोळीभाबडी माणसं दौलतीच्या हिफाजतीसाठी स्वत:च्या प्राणांचीही प्रसंगी कुरवंडी करतील याबद्दल त्यांना पुरेपूर यकीन होता आणि म्हणूनच त्यांनी आज्ञा केली - सरनोबत प्रतापराव गुजरांच्या कुशल नेतृत्वाखाली निवडक मावळा शिपाई आपल्या बोथट समशेरी आणि गंजलेले भाले घेऊन 'हर हर महादेव'च्या गर्जनेने बाहेर पडले. विजापुराच्या पश्चिमेस छत्तीस मैलावर उंबराणीपाशीच त्यांची दुष्मनांशी गाठ पडली.

रणमस्त खान आणि बहलोल खान दोघे खंदे वीर, कुशल सेनानी होते, पण त्यांच्या अफाट सैन्यात वतन आणि जहागिरी यांच्या लालसा उरी कवटाळलेले बाजारबुणगेच अधिक होते. युद्धातील यशापेक्षा त्यांना त्यांचं वतन अधिक प्रिय होते आणि वतनापरीस अधिक प्यारी जान ! - 'अल्ला हो अकबर'ची गर्जना करीत तेही तेज शस्त्रांनिशी हिंदवी सुराज्याच्या पाईकांना भिडले, पण अल्पावकाशातच बोथट समशेर असलेल्या हातात जी निष्ठा, देशाबद्दल जे प्रेम आणि जी ताकत होती त्याची ओळख पुरती पटली त्यांना - मावळ्यांच्या बोथट समशेरीचे वार सपासप त्यांच्या सर्वांगाची खांडोळी करू लागले - रक्ताचे पाट वाहू लागले आणि मग निवडक मराठ्यांच्या पुढं आपला निभाव लागणं नामुमकीन आहे याचा यकीन होताच दाती तृण धरून जेरीस आलेले रणमस्त खान आणि बहलोल खान गरदन झुकवून अपराध्यावत सरनोबतांच्या समोर पेश झाले -

प्रतापराव गुजर एक धडाडीचा सेनानी, निधड्या छातीचा शिलेदार पण दिलदार, तेवढाच नेक. शरण आलेल्यांना अभय देणं म्हणजे फर्ज सांभाळणं असं

समजणारा. गरदन झुकवून अपराध्यावत समोर उभ्या राहिलेल्या या उन्मत्त सैतानांच्या दीनवाण्या मुद्रा आणि पश्चात्तापदग्ध चेहरे पाहून पाघळला तो – दया आली त्याला त्या दोघांची– आणि म्हणूनच 'या उपरी मराठी दौलतीला तोशीस देणार नाही' असा तह करून त्या दोघांनाही जीवदान देऊन त्यांनी जाऊ दिले.

प्रतापराव गुजर एक निष्पाप, खुल्या दिलाचा मराठा. काफर यवनांच्या दिलात विश्वासघाताच्या हलाहलाशिवाय दुसरं काहीच नसतं हे त्याला कुठून कळावं ? पण थोरले महाराज यवनांचं नख नि नख पारखत होते – त्यांचा नीचपणा अचूक ओळखत होते. नाग–सर्पाला जीवनदानाचं दूध पाजून सरनोबतांनी गलती केली आहे याची त्यांना वेळीच जाणीव झाली. ते संतापले – त्यांना बोल लावला – लिहिले, ''तह करून मोंगल सोडिला हे ठीक न केले. आयास आला तसाच बुडवावा हे का न केले ?''

स्वामिनिष्ठ सेवक प्रतापराव गुजर स्वामींची मर्जी खपा झाली आहे असं पाहताच खजील झाला. स्वामींचे शब्द तीक्ष्ण शस्त्रावत जिव्हारी बोचले त्यांच्या. आपल्या हातून गलती झाल्याची जाणीव त्यांना निमूट बसू देईना. ते बेचैन झाले –

आणि त्याचवेळी विश्वासघातकी यवन उलटल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. ''या उपरी मराठी दौलतीला तोशीस देणार नाही'' असा तह करून आणि अल्पावकाशात तो मोडून मराठी दौलतीत घुसलेल्या आणि पन्हाळा प्रांताचा घास घेऊ पाहणाऱ्या रणमस्त खान व बहलोल खानाचा त्यांना राग आला. स्वत:ची गलती दुरुस्त करण्यासाठी आणि आपल्या निष्कलंक चारित्र्याला स्वामींनी लावलेला बोल धुवून काढण्यासाठी उतावळे झाले आणि मग आपल्यापाशी मोठ्या गनिमाशी भिडण्याइतपत मोठी कुमक नाही, आपण केवळ सातचजण आहोत याचा विचारही न करता बेभान अवस्थेत यवनावर चालून गेले–

आणि दुष्ट यवनाला मौका सापडला. विश्वासघातकी नाग–सर्पानं दंश केला. सुराज्याचा एक अनमोल मोहरा पडला. जणू मराठी दौलतीच्या आकाशातला एक ताराच निखळला – गडहिंग्लजजवळ घटप्रभेच्या उत्तरेस एक मैलावर नेसरी खिंडीत प्रतापराव गुजर आपल्या सहा निधड्या छातीच्या सवंगड्यांसह पडले. ज्यानं जीवदान दिलं होतं त्याच्याच जिवाचा घास घेऊन यवन तृप्त झाला होता.

हा आघात काही लहान नव्हता – प्रत्यक्ष सरनोबत पडले होते. सेनापतीच पडल्यामुळे मराठी सैन्य निराधार–निराश्रित आणि बेवारस झालं होतं; पण सरनोबत पडल्याचं दु:ख उरी कवटाळून अश्रू ढाळीत बसलेला मावळा शिपाई पाहून समाधान



पावलेल्या गनीम यवनाला चेव चढला होता. तो फुत्कार टाकीत मराठी दौलतीचे आणखीन लचके तोडायला पुढेच सरसावला होता.

प्रसंग मोठा बाका होता. गनीम वेळीच थोपवायला हवा होता आणि म्हणूनच हंबीरराव मोहित्यासारखा मराठी सैन्यातील एक मामुली जुमलेदार हातात समशेर घेऊन आपल्या बरोबरीच्या निवडक मावळ्यांना धीर देत पुढे सरसावला होता – थेट गनिमासमोर उभा राहिला होता.

'हर हर महादेव'ची घनगर्जना करीत काफर यवनावर तुटून पडला होता. स्वामींच्या आशीर्वादाने आणि आई भवानीच्या कृपाप्रसादाने त्याच्या समशेरीला अवकाशातील विद्युल्लतेची गती आली होती. मोंगल कापला जात होता – पळू लागला होता – 'दीन दीन' अशा आर्त किंकाळ्या ठोकीत प्यारी जान वाचविण्याच्या इराद्यानं थेट विजापुरापर्यंत मागे हटला होता –

एक जुमलेदार फत्ते पावला होता. यशश्री घेऊनच स्वामीदर्शनार्थ आला होता. स्वामींची – थोरल्या महाराजांची तृप्त नजर पाहून धन्य धन्य जाहला होता – आणि मग मराठी दौलतीच्या स्वामींनी – प्रत्यक्ष थोरल्या महाराजांनी चिपळूण येथे आपल्या लष्कराचा मेळावा भरवून साऱ्या लष्करासमोर एका य:कश्चित जुमलेदाराला सरनोबती देऊन त्याचा गौरव केला होता.

तुफान वेगाने वाऱ्याशी स्पर्धा करीत पुढेपुढेच चाललेल्या सरनोबत हंबीरराव मोहित्यांना हा प्रसंग जसाच्या तसा आठवला. थोरल्या महाराजांची तेजस्वी, घनगंभीर आणि करारी मुद्रा त्यांच्या नजरेसमोर जशीच्या तशी उभी राहिली आणि मग जणू काही त्या मुद्रेचे ओठ हलले – शब्दही बाहेर पडले – हंबीररावांनी ते अगदी स्पष्ट ऐकले. स्वामी जणू त्यांना पुसत होते, ''हंबीरराव मराठ्यांच्या लष्करात एक मामुली जुमलेदार होता तुम्ही. आपल्याला सरनोबती पावेल असं कधी तुमच्या स्वप्नातही नव्हतं; पण जे स्वप्नात नव्हतं ते घडलंच ना ? हंबीरराव, तुम्ही म्हणाल, हे खोटं आहे. आम्ही कोण तुम्हाला सरनोबती देणार ? आम्ही तर दौलतीचे पाईक. दौलत श्रींची. जे द्यायचं असतं ते प्रत्यक्ष जगदीश्वरानं द्यायचं असतं. हंबीरराव, माणसाला ज्यावेळी दैवाची साथ मिळते तेव्हा तो लीलया अवकाशालाही गवसणी घालतो. आम्ही नाही का आमच्या माँसाहेबांचं हिंदवी सुराज्याचं स्वप्न साकार केलं ?... हंबीरराव हे सारं काही आम्ही केलं नाही. आम्ही फक्त निमित्त झालो. जे काही केलं ते सारं जगदीश्वरानं आमच्याकडून करवून घेतलं.''

''महाराजऽऽऽ'' नकळतच हंबीररावांचे ओठ हलले. त्यांनी अदबीनंच पुसलं, ''महाराज, मराठी दौलतीचं स्वप्न साकार करायला पाठीशी उभ्या राहिलेल्या परमेश्वरानं मग नेमक्या मराठी दौलतीच्या स्वामींनाच का नेलं ? का या हिंदवी सुराज्याला निराधार केलं ? दौलतीचं नेतृत्वच हिरावून घेऊन काळानं साधलं तरी काय ?''

महाराज हसले – अगदी मनापासून हसले. महाराजांचं हे हसू हंबीररावांच्या चांगलंच परिचयाचं होतं. ज्या ज्या वेळी हंबीरराव फत्ते करून महाराजांच्या दर्शनाला गेले होते, त्या त्या वेळी महाराज हे असेच हसले होते. समाधानाने अगदी तृप्त होऊन.

आताही महाराज अगदी असेच हसले. मृदू – मधुर स्वरात म्हणाले, ''हंबीरराव, आपण माणसं – सामान्य जीव ! – सबल अशा नियतीबद्दल आम्ही पामरांनी काय बोलावं! हंबीरराव, माणूस म्हणून आपणही मानवी नीतीनियमांच्या बंधनात अडकलेले असतोच ना? आम्हाला आपल्या बरोबर नेऊन कदाचित काळानं आपल्या नीतीनियमांचं पालन केलं असेल –''

''पण त्यामुळं दौलतीची हालत भलतीच बिघडली आहे. महाराज दौलतीला आतापावेतो केवळ एकच आणि तोही यवन शत्रूच होता; पण आज स्वकीयही दौलतीचे गनीम बनले आहेत. स्वार्थासाठी दौलतीला यवनांच्या घशात घालायलाही ते तयार झाले आहेत.

आता मात्र महाराज गंभीर झाले. गंभीर स्वरात म्हणाले, ''हंबीरराव, स्वत:वरचा तुमचा विश्वास उडाला आहे. प्रत्यक्ष जगदीश्वराला तुम्ही विसरला आहात. म्हणूनच तर ही एक अनामिक भीती सैतानाचं रूप घेऊन तुमच्या गरदनीवर स्वार झाली आहे. हंबीरराव, काळ जसा समर्थ आहे, तसाच सर्वव्यापी आणि सर्वज्ञानीही आहे. काळानं असत्याची बाजू घेऊन उच्छाद मांडल्याचं एक तरी उदाहरण तुम्ही सांगू शकता का हंबीरराव ? हंबीरराव, रावण माजला होता. नीतीनियमांना झुगारून देऊन बसला होता; पण प्रभू रामचंद्राच्या रूपात वेळीच त्याचं पारिपत्य करून त्याची मदांध सत्ता मोडलीच होती ना ? कौरवांचंही तसंच होतं. सुईच्या अग्राएवढीही जमीन द्यायला तयार नसलेले आणि पांडवांचा अधिकार बळकावून सार्वभौम होऊ पाहणाऱ्या कौरवांनादेखील अंती आपलं सर्वस्व गमवावं लागलं होतंच ना ? एवढंच काय मराठी दौलत घशात घालून धर्म बुडवू पाहणाऱ्या यवन अफजलखानाची काय गत झाली होती ? आणि ... आणि हंबीरराव, मराठ्यांच्या



राजधानीत कटकारस्थानांना ऊत आला असताना आणि प्रत्यक्ष दौलतीच्या स्वामींना जेरबंद करू पाहणाऱ्या अण्णाजी दत्तो मोरोपंतादि वरिष्ठांच्या दुष्ट चालीला शह देण्याचं काम हंबीरराव प्रत्यक्ष तुम्ही केलं नव्हतं का? शंभूराजांची बाजू घेऊन प्रत्यक्ष आपल्या बहिणीशी – हिंदवी सुराज्याच्या महाराणीशी – सोयराबाईशी दुष्मनी पत्करली नव्हती का ? कशासाठी ही दुष्मनी पत्करलीत ? हे एवढं धाडस करण्याची बुद्धी कुणी दिली तुम्हाला ?... प्रत्यक्ष जगदीश्वरानेच ना ?''

थोरले महाराज क्षणभरच थांबले. त्यांच्या भेदक नजरेने एकदाच हंबीररावांच्या मुद्रेला न्याहाळले. हंबीररावांना महाराजांच्या नजरेला नजर देण्याचे साहस झाले नाही.

महाराज हसले, पण आताचं त्यांचं हसू नित्याप्रमाणे मोहक नव्हतं. त्यातून काहीसं गांभीर्य प्रकट झालं होतं. हंबीरराव ऐकू लागले. महाराज म्हणाले, ''हंबीरराव जगदीश्वराची निष्ठा कमी होऊ देऊ नका. दौलत बुडवायची की, वाढवायची हे सर्वस्वी त्याच्यावर अवलंबून आहे. हंबीरराव, आजकाल जगदीश्वर शंभुराजांच्या रूपात दौलतीच्या हिफाजतीसाठी उभा राहिला आहे. उद्या तो आणखीन कुणाच्यातरी रूपात दौलतीच्या हिफाजतीसाठी उभा राहील. मात्र अंतापर्यंत अन्यायाचा निश्चितच प्रतिकार होत राहील. हंबीरराव, कालौघात काय दडलेलं आहे हे शोधण्याचा प्रयत्न करू नका, मात्र त्याच्याबद्दल अविश्वास मुळीसुद्धा दाखवू नका. जो औरंगजेब दौलत बुडविण्याच्या जिद्दीने दक्षिणेत उतरला आहे तोच औरंगजेब एक ना एक दिवस आपल्या अधर्मानं या मातीतच गाडला जाईल. जगदीश्वर कुणाच्या तरी रूपानं त्याची इथंच कबर बांधण्याचा इंतजाम करील – अगदी निश्चित !''

शेवटी शेवटी तर महाराजांच्या शब्दाला धार चढली होती – त्यांच्या शब्दा-शब्दातून अगाध विश्वास प्रकट होऊ लागला होता. महाराज थांबले. हंबीररावांनी गरदन वर करून समोर पाहिले. समोर महाराज नव्हते. त्यांची ती तेज:पुंज, करारी, धीरगंभीर मुद्रा नव्हती. होते फक्त अवकाश – अफाट आणि विस्तीर्ण – नीलवर्णीय ...

आपल्याला भास झाल्याची जाणीव त्यांना चटकन झाली – ते भानावर आले. त्यांची भेदक नजर सभोवार भिरभिरून आली. याक्षणी त्यांचा घोडा जंगलाच्या बाहेर पडलेला होता. समोर उतार होता. शिवाय वरती नीलवर्णीय विस्तृत आकाश. वरच्या विस्तृत अवकाशाकडे नजर जाताच त्यांच्या मनात आले, 'अवकाशाच्या लांबीरुंदीचा खोलीचा अजुनी तरी कुणालाही अंदाज आला

आहे काय ? शिवाय त्याच्यात काय दडलेले आहे हे तरी कुणाला ठावे आहे ? काळाचंही असंच नाही का ?''

काळ सर्वश्रेष्ठ हेच खरं ! - तो जेवढा समर्थ तेवढाच अनाकलनीय. क्षुल्लक माणसानं नाही तरी काळासमीप जाण्याची जिद्द करूच नये कधी. गाभाऱ्यातल्या जगदीश्वरासमीप गेल्यानं जसं माणसाला जगदीश्वरापाशीचं देवत्व हासील होत नाही तद्वतच काळासमीप गेल्याने त्याचं अफाट आणि अजस्र सामर्थ्य मोजता येत नाही. थोरले महाराज म्हणतात त्याप्रमाणं काळाचा अंदाज घेण्याचा यत्न न करता केवळ त्याचं विस्मरण होऊ न देणं हेच सामान्य माणसाच्या दृष्टीनं हिताचं.

वरच्या असीम-विस्तीर्ण अवकाशाकडे लक्ष जाताच हंबीररावांच्या मनात हेच आणि अशाच प्रकारचे विचार काही वेळ घोटाळले. नकळतच तशाही स्थितीत त्यांचे नेत्र मिटले - मनोमन काळाच्या समर्थ; पण निराकार रूपाशी एकरूप होऊन ते पुटपुटले, 'बा काळा तुझी लीला अगाध आहे. माझ्यासारखा मामुली माणूस म्हणजे तुझ्या दृष्टीनं यःकश्चित गवताचं पान - त्याला पायाखाली तुडवायचं - त्याला बुडवायचं म्हटलं तर ते का तुला अशक्य आहे ? तू मनात आणशील तर केवळ निमिषार्धात साऱ्या ब्रह्मांडाला भस्मसात करून टाकशील. सारी दुनिया स्वाहा करशील. तुझ्या या अफाट आणि समर्थ स्वरूपाचं विस्मरण दिल्लीपती औरंगजेबाला झालं म्हणूनच स्वत:ला सर्वश्रेष्ठ अवलिया मानून तो दक्षिणेत उतरला. भवितव्यात काय दडलं आहे हे जरी म्या पामराला सांगता आले नाही तरी थोरल्या महाराजांच्या अमृतवचनाप्रमाणं देव, धर्म आणि देश यांची कास धरून त्यापायी सर्वस्व निछावर करायला तयार असलेली ही मराठी माणसं - अंती त्यांचीच फत्ते झाल्याशिवाय राहणार नाही. तू त्यांचा सांगाती बनून यशश्री त्यांच्या गळ्यात घातल्याशिवाय राहणार नाहीस याबद्दल आम्हाला तिळमात्रही शंका नाही -''

हंबीरराव मोहित्यांनी नेत्र उघडले - आता त्यांच्या चेहऱ्यावरील निराशेचे ढग कुठल्याकुठे पसार झाले होते. नजरेत तीच नित्याची धार विलसू लागली होती. त्यांनी एकदाच आपल्या उजव्या हाताच्या पालथ्या मुठीने आपल्या झुपकेदार काळ्या मिशांचे आकडे सरळ केले आणि समोर पाहिले.

तळबीड नजरेत भरू लागले होते. मोहित्यांच्या वाड्यावर मराठ्यांचा भगवा झेंडा वाऱ्याच्या झोताने डौलात फडकत होता. त्यांच्या दिलात स्वधर्म आणि स्वदेशाबद्दलचा अभिमान भरत होता. ते हसले - तशाही स्थितीत त्यांनी मनोमन



डौलात फडकणाऱ्या त्या मराठ्यांच्या भगव्याला मुजरा केला आणि नकळतच आपल्या उमद्या जनावराची गती वाढविली.

जवळजवळ वर्ष-दीड वर्षानं ते तळबीडला परतत होते. या वर्ष-दीड वर्षात स्वराज्यातील स्वकीयांच्या कटकारस्थानांनी आणि यवन शत्रूंच्या हमल्यांनी घरची याद करण्याला त्यांना फुरसतच मिळाली नव्हती आणि त्याबद्दल त्यांना खेद वा खंतही वाटत नव्हती. श्रींच्या इच्छेनं उभ्या राहिलेल्या दौलतीपायी सर्वस्व निछावर करण्याची शिकवण प्रत्यक्ष दौलतीच्या स्वामींनी थोरल्या महाराजांनीच तर दिली होती. भोळ्या-भाबड्या पण निधड्या छातीच्या मराठ्यांनी ती स्वेच्छेने अंगीकारिली होती - एवढंच नव्हे तर घेतलेल्या आणाशपथांची हिफाजत करण्यासाठी कित्येकांनी यवन शत्रूशी झगडत असताना मृत्यूला मिठीही घातली होती. हंबीरराव स्वत:ही दौलतीचे पाईक होते. त्यांच्यात देव-धर्म-देशप्रेम याविषयी निष्ठा होती. मग ते तरी घरच्या ओढीनं कर्तव्याकडे पाठ फिरविण्याचा कसा विचार करतील ? कसे स्वार्थाला कवटाळतील?

वर्ष-दीड वर्ष ते घरापासून दूर होते-स्वकीयांच्या विरहात होते; पण त्याबद्दलचं दु:ख वा खंत त्यांच्या मनाला स्पर्शच करू शकत नव्हती. त्यांना खंत होती वेगळीच. हे वर्ष-दीड वर्ष यवन शत्रूशी झगडण्यात खर्च करावी लागली असती आणि यवन शत्रूशी झगडत असताना धारातीर्थी पडण्याची नौबत जरी त्यांच्यावर आली असती तरी त्यांचं त्यांना काहीच वाटलं नसतं; पण हे वर्ष-दीड वर्ष त्यांना स्वकीयांशी भांडत बसावं लागलं होतं. अण्णाजी दत्तो-मोरोपंत-प्रल्हाद निराजी सारख्या दौलतीच्या एकनिष्ठ पाईकांच्या कटकारस्थानांच्या विरुद्ध उठावं लागलं होतं. दुर्दैवानं या स्वकीयांनाच जेरबंद करावं लागलं होतं आणि... आणि प्रत्यक्ष बहिणीची- सोयराबाईची- मराठी दौलतीच्या महाराणीची दुष्मनी पत्करावी लागली होती.

हंबीररावांना खंत होती ती याच गोष्टीची-खेद वाटत होता तो याचाच आणि म्हणूनच तर जे कधी स्वप्नातही आलं नव्हतं ते घडविणाऱ्या काळाची त्यांना काहिशी भीतीही वाटू लागली होती; पण त्याचबरोबर थोरल्या महाराजांच्या त्या अमृत बोलांच्या आठवणीने त्यांना धीरही येत होता. थोरल्या महाराजांचे ते शब्द या क्षणीही आपल्या कानावर येत असल्याचा त्यांना भास होत होता- थोरले महाराज त्यांच्या अगदी जवळ येऊन त्यांना म्हणत होते, ''सरनोबत माणसानं काळाचं भय बाळगण्याऐवजी आपण जे करतो आहोत ते उचित आहे की नाही याचा प्रथम विचार करावा. त्यांची कसोटी स्वत:च्या दिलाकडूनच अगदी नि:स्पृहपणे करून